## व्यवसाय / धंदा

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...

दारू... अंमली पदार्थ... गॅरंटेड सुटण्यासाठी...

व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..

(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र

फोन: 9552619752

कॉल / व्हॉटस्‌ॲप करा... दारू... अंमली पदार्थ... राम राम करा...

501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २८२ वा | सोमवार, दि. २३ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# मुख्यमंत्री फडणवीसांना हिंदी सक्तीवरून कायदेशीर नोटीस

## पक्ष फोडायचा अन आमदार गोळा करायचे हे मुलांनी पहिलीपासून शिकायचं म्हणा ना?

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** भाषा सक्तीबाबत खोटे विधान करणे, सर्वोच्च न्यायालयाचा संदर्भ देत चुकीची माहिती देणे, तसेच राज्यपालांनी दिलेल्या शपथेचा भंग करणे, असे गंभीर आरोप करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

याबाबत वकील असीम सरोदे यांनी माहिती दिली आहे. राज्यात राज्य मंडळाच्या शाळांमध्ये मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना पहिलीपासून हिंदी भाषा अप्रत्यक्षरित्या सक्तीची करण्यावरून राज्यात वादंग सुरू आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रासमोर एक खोटे विधान जाहीरपणे केले आहे. त्यांनी सांगितले की, तामिळनाडू सरकारने सर्वोच्च न्यायालयात त्रिभाषा धोरणाला विरोध करणारी याचिका दाखल केली होती. हिंदी भाषा तिसरी भाषा म्हणून आम्ही वापरणार नाही, अशी मागणी त्यांनी केली होती. ती याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. त्रिभाषा सूत्र केंद्राने स्वीकारल्यामुळे आम्हाला ते करावे लागेल आणि हिंदी भाषा त्यासाठी आणावी लागेल, असे त्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला. तो पूर्णपणे खोटारडेपणा आहे. त्यांनी असे खोटे वक्तव्य करून महाराष्ट्राची दिशाभूल करू नये. मराठी जनांचा अपमान करू नये. त्यांनी जे खोटे वक्तव्य केले आहे, त्याचा विचार केल्यास त्यांना राज्यपालांनी जी संविधानिक शपथ दिली आहे, त्या शपथेचाही तो भंग ठरतो. म्हणून त्यांनी महाराष्ट्राची आणि महाराष्ट्रातील जनतेची माफी मागितली पाहिजे, अशी मागणी वकील असीम सरोदे यांनी केली.

**पक्ष फोडायचा अन आमदार गोळा करायचे हे मुलांनी पहिलीपासून शिकायचं म्हणा ना?**

सक्तीच्या हिंदीकरणाविरोधात राज्यात संतापाचा उद्रेक झाला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी पहिल्यांदा हिंदीकरणाविरोधात आवाज उठवल्यानंतर आता कलाकार, मराठी लेखकांडून आवाज उठवण्यास सुरुवात झाली आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणात तिसऱ्या भाषेची सक्ती नसतानाही सरकारी वरवंटा का आणि कोणासाठी फिरवला जात आहे असा सुद्धा संतप्त सवाल महाराष्ट्रातून उपस्थित होत आहे. दरम्यान, मराठी लेखक अरविंद जगताप यांनी अत्यंत तिखट आणि खोचक शब्दात हिंदीकरणाची चिरफाड केली आहे. त्यांनी सोशल मीडियात पोस्ट करून एकप्रकारे राजकीय सत्तेला चपराक दिली आहे. राज्यातील आमदार फोडाफोडीवरूनच त्यांनी उदाहरण देत हिंदीकरणाला कडाडून विरोध केला आहे.

**सुमारे १६ ते १७ हजार मराठी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत**

भाषा जोडणाऱ्या असायला हव्यात. त्या तोडण्यासाठी किंवा राजकारणासाठी त्याचा वापर करणे अत्यंत चुकीचे ठरू शकते. भारतात जी भाषिक विविधता आहे, ती आपली ताकद आहे आणि ती कायम राहिली पाहिजे. एका राज्यासाठी एक न्याय आणि दुसऱ्या राज्यासाठी दुसरा न्याय असे का केले जात आहे, याचे उत्तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले पाहिजे, अशी मागणी वकीस असीम सरोदे यांनी केली आहे. मराठी शाषा मरणासन्न अवस्थेत पोहोचल्या आहेत. सुमारे १६ ते १७ हजार मराठी शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. शाळांना निधी दिला जात नाही. मराठी शाळांची मुस्कटदाबी केली जात आहे, असा दावा असीम सरोदे यांनी केला.

दरम्यान, त्याबद्दल त्यांनी काम केले पाहिजे, बोलले पाहिजे. परंतु, तसे ते करताना दिसत नाहीत. त्यामुळे त्यांना आम्ही कायदेशीर नोटीस पाठवत आहोत. त्यांनी जे चुकीचे वक्तव्य केले आहे, महाराष्ट्राची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे, त्याबद्दल माफी मागितली पाहिजे. त्यांनी ७ दिवसांत नोटिसीला उत्तर दिले नाही, त्याबाबत काही वक्तव्य केले नाही, तर न्यायालयात जाण्याचा मार्ग आम्ही मोकळा ठेवला आहे, असे वकीस असीम सरोदे यांनी म्हटले आहे.

**काय म्हटलं आहे अरविंद जगताप यांनी?**

अरविंद जगताप यांनी इन्स्टा पोस्ट करून म्हटलं आहे की, पहिलीतल्या वीस मुलांनी एकत्र यायचं आणि तिसरी वेगळी भाषमा निवडायची. मग हे सरकार शिक्षक देणार. म्हणजे पक्ष फोडायचा अन आमदार गोळा करायचे हे मुलांनी पहिलीपासून शिकायचं म्हणा ना. अरविंद जगताप यांच्या पोस्टला नेटकऱ्यांनी दाद देत कमेंट केल्या आहेत. एकाने कमेंट करत पट ५० असेल आणि 20-20 चे दोन गट पडले एक गट हिंदी तर एक गट कन्नड शिकत असेल तर मग उरलेल्या 10 जणांनी कोणती भाषा शिकायची? विचारणा केली आहे. शिक्षणाचा बाजार मांडला मांडल्यानंतर अपेक्षा काय ठेवाव्यात आणि कोणाकडून? अशीही कमेंट एकाने केली आहे.

## आषाढी वारीच्या काळात पंढरपुरात सलग 10 दिवस मास विक्रीस बंदी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी वारीचा सोहळा जवळ येत आहे. लाखो वारकरी पालख्यांसोबत पंढरीच्या दिशेनं आपल्या लाडक्या विठुरायाच्या भेटीसाठी मार्गस्थ होत आहेत. या काळात रस्त्यावर ठिकठिकाणी उघडपणे मास मटन विक्रीची दुकाने मार्गात लागत असतात.

याशिवाय पंढरपुरात प्रवेश करतानाही विविध मार्गावर अशी मास मटन विक्रीची दुकाने आहे. गेल्या अनेक वषार्पासून पालखी सोहळा प्रमुख आणि वारकरी संप्रदायाचे संत मंडळी यांनी यात्रा कालावधीत पंढरपूर शहरातील आणि पालखी सोहळा येताना संबंधित गावातील मास मटन विक्री बंद ठेवण्याची मागणी करत होते. अखेर त्यांच्या या मागणीला यश आलं आहे. यंदा प्रथमच आषाढी वारीच्या इतिहासात यात्रा कालावधीतील सलग 10 दिवस पंढरपुरातील मास मटन विक्रीस बंदी करण्यात आली आहे.

**पंढरपूर शहरात सलग 10 दिवस मास मटन विक्रीस पूर्णपणे बंदी**

यावर्षी पहिल्यांदाच सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना आषाढी एकादशी पूर्वी सात दिवस व एकादशीनंतर तीन दिवस पंढरपूर शहरातील मास विक्री पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश देण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या पद्धतीने जिल्हाधिकाऱ्यांनी पंढरपूर शहरातील मास मटन विक्रीस यात्रा कालावधी मध्ये दहा दिवस पूर्णपणे बंदी घातली आहे. दरवर्षी केवळ तीन दिवस ही बंदी असायची मात्र आता वारकऱ्यांच्या आग्रही मागणीनंतर पंढरपूर शहरात सलग 10 दिवस मास मटन विक्रीस पूर्णपणे बंदी राहणार असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

**ज्या गावात पालखी येईल तिथेही त्या दिवशी मास विक्रीस बंदी**

दरम्यान, याच पद्धतीने पालखी मार्गावर ज्या दिवशी पालखी ज्या गावात प्रवेश करेल आणि त्या गावातून प्रस्थान ठेवेल तेवढा संपूर्ण कालावधी संबंधित गावातील मटन विक्रीस बंदी घालण्यात आलेली आहे. याचे वारकरी संप्रदायातून स्वागत होत आहे. गेल्या अनेक वषार्पासून केलेल्या मागणीला अखेर फडणवीस सरकारने मान्यता दिली आहे.

**पुण्यातील दोन दिवसांच्या मुक्कामानंतर पालख्या पंढरीच्या दिशेनं मार्गस्थ**

दोन दिवसांच्या मुक्कामानंतर संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी आज पुण्यातून मार्गस्थ झाली आहे. गेले दोन दिवसा पुणेकरांनी आणि आजूबाजूच्या भागातून आलेल्या भाविकांनी पालख्यांचं दर्शन घेतलं. यानंतर दोन्ही पालख्या आता पुण्याहून निघाल्या आहेत. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी पुण्यातील विठोबा मंदिरातून सकाळी 6 वाजता मार्गस्थ झाली आहे. ज्ञानेश्वरांची पालखी आज दिवेघाटमार्गे सासवडला जाणार आहे. दुसरीकडे तुकाराम महाराज पालखीचा मुक्काम आज लोणी काळभोर येथे असणार आहे.

## सोलापुरात स्मार्ट सिटीसह अन्य विकासकामांच्या गुणवत्तेची तपासणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** स्मार्ट सिटी प्रकल्पासह नगरोत्थान, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी दलितवस्ती सुधारणा योजना आणि अल्पसंख्याक विकास योजनेसह जिल्हा नियोजन समितीकडून मंजूर निधीतून झालेली विकासकामे निकृष्ट दर्जाची असल्याच्या वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर त्या संपूर्ण कामांची केंद्रीय संस्थेकडून स्वतंत्रपणे तपासणी केली जाणार आहे. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी ही माहिती दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत झालेली बहुसंख्य विकासकामे उत्कृष्ट दजार्ची आहेत. यातील बरेच प्रकल्प धूळखात पडून आहेत. यातून कोट्यवधी रुपयांचा निधी पाण्यात गेला आहे. याशिवाय लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी दलितवस्ती सुधारणा योजना, नगरोत्थान योजना, अल्पसंख्याक विकास योजना, तसेच जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून झालेल्या विकासकामांच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अखेर त्याची दखल घेत पालिका आयुक्त डॉ. ओंबासे यांनी, या संपूर्ण विकासकामांच्या गुणवत्तेची तपासणी केंद्र सरकारकडील सीआयएल संस्थेमार्फत प्रायोगिक तत्त्वावर केली जाणार असल्याचे सांगितले. या तपासणीतून सत्य बाहेर यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**सिद्धेश्वर तलावासाठी पाच कोटी**

शहराच्या पर्यावरणीय निसर्गसौंदर्य असलेल्या बाराव्या शतकातील ऐतिहासिक




सिद्धेश्वर तलावात अलीकडे मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढले आहे. तलावात प्राणवायूअभावी हजारो मासे, शेकडो कासवांसह इतर जलचर नष्ट होत आहेत. त्याची दखल घेऊन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी तातडीने बैठक घेऊन तलावातील पर्यावरण संवर्धनासाठी कृती आराखडा तयार करण्याचा आदेश दिला होता.

त्यानुसार तलावात मोठ्या प्रमाणात कारंजे उभारण्यात येत असून, १४ एरिएटर्स बसविण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी ५४ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. याशिवाय जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून तलावाच्या सुधारणांसाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सिद्धेश्वर तलावातील पर्यावरण संवर्धनासाठी नैनिताल येथील प्रशासनाशी संपर्क साधून पूरक माहिती घेण्यात आली आहे. त्याचा लाभ होईल, अशी अपेक्षा डॉ. ओंबासे यांनी व्यक्त केली आहे.

## माउलींचा पालखी सोहळा, संत सोपानदेवांच्या सासवड नगरीत

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** पुणे शहरातील दोन दिवसांच्या मुक्कामानंतर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींचा पालखी सोहळा रविवारी अवघड दिवे घाट पार करून संत सोपानकाकांच्या सासवड नगरीमध्ये विसावला. सासवड नगरीत प्रवेश केल्यानंतर समाजआरती झाली.

माउलींची पालखी दोन दिवस सासवड मुक्कामी असणार आहे.

पुण्यामध्ये माउलींच्या पादुकांची पहाटे पूजा, आरती झाल्यानंतर सकाळी सहा वाजता पालखी सोहळा सासवडकडे मार्गस्थ झाला. हडपसर, वडकीनाला येथे भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. एकादशी असल्याने वारकरी बांधवांना ठिकठिकाणी फराळाचे वाटप करण्यात आले. पुणे ते सासवड हा आषाढी वारीतील सर्वांत मोठा ३२ किलोमीटरचा अवघड टप्पा आहे. दुपारी तीन वाजता पालखी सोहळ्याने अवघड दिवे घाट चढण्यास सुरुवात केली. नागमोडी वळणांचा, हिरवाईने नटलेला दिवेघाटात पावसाने उघडीप दिल्याने वातावरण आल्हाददायक होते. टाळ, मृदंगाच्या जयघोषात विठूनामाचा गजर करीत पालखी सोहळा पुढे निघाला.



दिवे घाटात चढ मोठा असल्याने माउलींच्या चांदीच्या पालखी रथाला एकूण पाच बैलजोड्या जुंपल्या जातात. दिवे येथील शेतकरी राहुल त्र्यंबक झेंडे आणि रमेश बबन शिंदे तसेच सचिन शिवाजी झेंडे यांच्या बैलजोडींना हा मान मिळाला. बैल जोड्यांशिवाय पयार्यी व्यवस्था म्हणून रथावर इलेक्ट्रिक मोटरही बसवण्यात आली होती. दिवे घाट चढताना थकवा येऊ नये म्हणून अनेक दिंड्यांमध्ये टाळ मृदंगाच्या तालावर निरनिराळी अभंग गीते म्हणत वारकरी नाचत होते. आवाज टिपेला पोहोचत होता. दिवेघाट चढून वर आल्यावर माउलींनीच आपल्याला घाट चढण्याचे बळ दिले, असे भाव वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर जाणवत होते.

सात किलोमीटरचा दिवेघाट पार करून माउलींचा पालखी सोहळा वर आला तेव्हा हजारो भाविक पालखी सोहळा पाहण्यासाठी उपस्थित होते. आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, प्रांताधिकारी वर्षा लांडगे, तहसीलदार विक्रम रजपूत, सासवडचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी बरडे, पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी यांनी पालखीचे स्वागत केले. वडकी येथून पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सात किलोमीटर पायी चालताना वारकऱ्यांशी संवाद साधला. मार्गावर आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने सारा परिसर उजळला होता. ज्ञानेश्वर माउलींचे धाकटे बंधू संत सोपानकाकांच्या समाधी मंदिरात दर्शनासाठी वारकऱ्यांनी गर्दी केली होती.

## महास्वच्छता अभियानातून स्वच्छतेचा संदेश घरोघरी पोहोचवण्याचे क्रांतिकारी कार्य झाले - पालकमंत्री जयकुमार गोरे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर शहर महास्वच्छता अभियान 2025 अंतर्गत एकाच वेळी सकाळी सात ते दहा या कालावधीत 42 ठिकाणी स्वच्छता मोहीम राहुल 148 कचरा गोळा करण्यात आला. या मोहिमेत सोलापूर जिल्हा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, सामाजिक संस्थांचे स्वयंसेवक, विविध सामाजिक संघटना, पंढरपूर शहरातील नागरिक यांनी सक्रिय



सहभाग घेऊन ही विठुरायाची नगरी बहुतांश स्वच्छ केली आहे. या मोहिमेतून पंढरपूर शहर व येथे येणाऱ्या हजारो भाविकांच्या घरोघरी स्वच्छतेचा संदेश पोहोचविण्याचे क्रांतिकारी कार्य घडले असल्याचे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

पंढरपूर शहर महास्वच्छता अभियान 2025 चा समारोप कार्यक्रम प्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आ. देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महापालिकेचे आयुक्त सचिन ओम्बासे, माजी आमदार प्रशांत परिचारक, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, नगरपालिका प्रशासन अधिकारी वीणा पवार, पंढरपूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख व मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, या स्वच्छता अभियानातून विठुरायाची नगरी स्वच्छ करण्याचे काम आपल्या सर्वांच्या श्रमातून झालेले आहे. ही वारी पूवीर्ची स्वच्छता असून वारीनंतरही स्वच्छता करण्यात येणार आहे.या मोहिमेसाठी सोलापूर जिल्ह्यासह सातारा जिल्ह्यातील ही सामाजिक संस्थांनी पुढाकार घेतला असून आजच्या मोहिमेत सात ते आठ हजार स्वयंसेवक नागरिकांनी सहभाग घेतला. यामध्ये तरुणांचा सहभाग ही महत्त्वपूर्ण बाब होती व पुढील काळात या स्वच्छतेच्या संदेशाबाबत नागरिकांमध्ये प्रबोधन करतील व स्वतःही क्रियाशीलपणे राबवतील असे त्यांनी सांगितले.

पंढरपूर शहरातील सर्व नागरिक व्यापारी, व्यावसायिक यांनी आपापल्या दुकानासमोर कचरा टाकण्यासाठी छोट्या छोट्या कचरा पेट्या ठेवाव्यात व त्यामध्येच कचरा टाकून तो नगरपालिकेच्या कचरा संकलन टीम कडे द्यावा. त्याप्रमाणेच विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर नगरीत येणाऱ्या वारकरी भावी यांनीही कचरा कोठेही रस्त्यावर टाकू नये नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या जवळपासच्या कचराकुंड्यामध्येच कचरा टाकावा असे आवाहन पालकमंत्री गोरे यांनी करून स्वच्छ पंढरपूर, स्वच्छ चंद्रभागा, नमामी चंद्रभागा यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे त्यांनी सांगितले.

पंढरपूर हे संपूर्ण राज्यासाठी महत्त्वाचे व पवित्र धार्मिक ठिकाण असून या विठुरायाच्या नगरीचा सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. पंढरपूरच्या कॉरिडॉरच्या विषयी सर्वांच्या संमतीनेच पूर्ण करण्यात येणार असल्याची माहिती (पान 2 वर..)




दैनिक सोलापूर कटूसत्य www.katusatya.in — मुख्य कार्यालय — संपादक पांडूरंग हरिदास सुरवसे — उपसंपादक सचिन मोहन जाधव — सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल

पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५१२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

### आपणही होवू शकता "मुक्त पत्रकार"

नमस्कार....,

आपणही "मुक्त पत्रकार" होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक "मुक्त पत्रकार" होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक "कटूसत्य" या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि "मुक्त पत्रकार" होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये "मुक्त पत्रकार" म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) "मुक्त पत्रकार" मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर "मुक्त पत्रकार" म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती "मुक्त पत्रकार" म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे "मुक्त पत्रकार" झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच "मुक्त पत्रकार" होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू

सपादक दै.सा.कटूसत्य

टिपः- "कटूसत्य" व "वृत्तदर्पण" या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.

## संपादकीय

# तुकोबा पालखी सोहळा उगम

यंदाच्या वर्षी जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यास 341 वर्षे होत आहेत. यानिमित्ताने संत तुकोबांच्या पालखी सोहळ्याचा उगम आणि विकास याबाबतचा तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याला 341 वर्षांची वैशिष्ट्यपूर्ण व वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. हा पालखी सोहळा प्रतिवर्षी आषाढी वारीला श्रीक्षेत्र देहू गावाहून निघून पंढरपूरला जात असतो. हा पालखी सोहळा तुकाराम महाराजांचे सुपुत्र नारायण महाराज यांनी सुरू केला.

श्रीनारायण महाराज हे श्रीतुकाराम महाराजांच्या पादुका व ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका एकाच पालखीत ठेवून ती पालखी समारंभपूर्वक मोठ्या सोहळ्याने दिंड्या, पताका, गरुडटक्के, टाळमृदुंगांच्या घोषात वैष्णव मंडळींसह ज्ञानोबा तुकाराम भजन करीत आषाढी वारीला देहूहून पंढरपूरला नेत असत. हा पालखी सोहळा सन 1685 मध्ये सुरू झाला. तो आजतागायत चालू आहे.

खरंतर पंढरीची वारी ही तुकाराम महाराजांच्या घराण्यात पिढ्यान्पिढ्या चालू होती. तुकाराम महाराज याविषयी सांगतात, पंढरीची वारी आहे माझे घरी। आणिक न करी तीर्थव्रत ॥ या घराण्याचे मूळ पुरुष विश्वंभरबाबा (तुकाराम महाराज त्यांच्यापासून आठवे पिढीचे वंशज), त्यांना त्यांची आई जाण करून देते की, 'तुझ्या वडिलो वडिली निधारी'. चालविली पंढरीची वारी। त्यासी सर्वथा अंतर न करी। तरीच संसारी सुफळपण॥

तुझ्या वाडवडिलांनी पंढरीची वारी निधारिने चालविली, आता तू चालीव. मातेची आज्ञा शिरसावंद्य मानून विश्वंभरबाबा एकादशीला पंढरपूरला जाऊ लागले. वद्य एकादशीला आळंदी येथे श्रीचे कीर्तन करीत असत. 'मग पंधरा दिवसा एकादशी। जात असे पंढरीशी। नेमे वारी धरीली ऐसी। अनुपम्य सुखाशी सोहळा।' मूळ पुरुषएवं विश्वंभर। विठ्ठलाचा भक्त थोर। त्याचे भक्तीने पंढरी सोडून। देहूस आले हरी॥

विश्वंभरबाबांनंतर त्यांचे पुत्र हरी व मुकुंद हे क्षात्रवृत्तीने राहू लागले. देहू सोडून राजश्रयाला गेले. पुढे त्या राज्यावर इस्लामी परचक्र आले त्यामध्ये धारातीर्थी पडले. धाकट्या मुकुंदाची राणी। तत्काळ अग्नी प्रदीप्त करोनी। सहगमनी निघाली ॥ थोरल्या मुलाची पत्नी गरोदर होती. पुढे तिला मुलगा झाला. त्याचे नाव विठ्ठल ठेवले. त्याने श्रीविठ्ठलाची सेवा परत सुरू केली.

मागील दुःख ना ठेवूनी अंतरी। चालविले वारी पंढरीची। योगक्षेम तो निधारी। चालवी श्रीहरी तयाचा ॥ त्या विठोबाचे पुत्र। पदाजी त्याचे नामभिधान। त्यानेही करोनी सप्रेम भजन। रुक्मिणी रमण आराधिला॥ पदाजीचा पुत्र शंकर। त्याने पूजीला रुक्मीणीवर॥ कान्हा शंकराचा कुमर। बोल्होबा कुमर तयाचा॥ त्या बोल्होबाचे पोटी परम। वैष्णव भक्त तुकाराम॥ विठ्ठल महाराजांचे पुत्र पदाजी, पदाजीचे पुत्र शंकर, शंकर महाराजांचे पुत्र कान्होजी ऊर्फ कान्होबा, (कान्होबा हे संत तुकाराम महाराजांचे आजोबा), कान्होबाचे पुत्र बोल्होबा हे संत तुकाराम महाराजांचे वडील होत. बोल्होबांनी चाळीस वर्षे पंढरीची वारी केली असल्याचे संदर्भ मिळतात. चाळीस वर्षे ते अवसरी। केली पंढरीची वारी।

बोल्होबांनंतर पंढरीची वारी तुकाराम महाराज करू लागले. तुकाराम महाराज दर वद्य एकादशीला दिंडीसह क्षेत्र आळंदीसही जात व तेथे कीर्तन करीत. ती परंपरा अजूनही चालू आहे. तुकयाचे सप्रेम कीर्तन। ऐकोनि भक्तीसी लागले जन। ते चवदाशे पताका घेऊन। पंढरीस जाण चालीले॥ तुकया समागमे जावया पाही। वारकरी आले देहूगावी। मग चोवीस अभंग लवलाही। पत्र ते समयी पाठविले॥ क्षेत्र आळंदीहून तुकोबाराय टाळकर्यांसह मोठ्या सोहळ्याने पंढरीच्या वारीला निघत. फक्त एकदा ते वारीच्या वेळेला आजारी पडले.

तशाही स्थितीत ते वारीला निघाले. पण पाऊल उचलेना. वारीला अंतर पडल्याचे दुःख तुकोबांना अनिवार झाले. वारीला जाण्याकरिता आलेल्या वारकर्यांबरोबर त्यांनी एक 24 अभंगांचे पत्र देवाला दिले. ते अभंगात म्हणतात, का माझे पंढरी न देखती डोळे। काय हे न कळे पाप त्यांचे॥ पाय पंथ का हे न चलती वाट। कोण हे अदृष्ट कर्म बळी॥ का हे पायावरी न पडे मस्तक। क्षेम का हस्तक न पावेती॥ का या इंद्रियांची नपुरे वासना। पवित्र होईना जिव्हा कीर्ती॥ तुका म्हणे जाऊनी मोकळे। पडेन हा लोळे महाद्वारी॥

तुकाराम महाराजांनंतर पंढरीच्या वारीची परंपरा तुकोबांचे धाकटे बंधू कान्होबा यांनी चालू ठेवली. गोपाळबुवा हे तुकोबारायांचे पणतू म्हणतात, तुकाराम ते स्वदेहाशी। झाला असती वैकुंठवाशी। परी अद्याप दर्शन सायासी। देता भक्तांशी नीज कृपे। प्रथम आरंभा जाण। करुणा भाकली कान्हाने। तयाशी स्वप्नी दिधले दर्शन। नीज कृपे आदरे॥ निळोबा गोसावी पिंपळनेरकर। आणिक बहिणाबाई गंगाधर। याही स्वप्नी येऊनी वैष्णवी। अनुग्रह साचार दिधला॥ तुकयासवे वैष्णव जन। श्रेष्ठ निघडे असता कोण। रामेश्वर पंडित थोर ब्राह्मण। जो न जाय परतोन गृहासी॥ तुकया धाकुटासहोदर जाण। कान्होबा त्याचे नामाभिधान। गंगाजी मवाळ तिसरा ब्राह्मण। किर्तनी गायन करू लागे॥

कान्होबा तुकोबांचे अनुग्रहित होते, तुकोबांबरोबर असणाऱ्या वैष्णव जनांत निघडे आणि श्रेष्ठ होते. ते प्रेमळ हरीभक्त होते. विद्वान कीर्तनकार होते. त्यांची अभंगवाणी प्रासादिक आहे. ह.भ.प.संताजी महाराज जगनाडे यांच्या अभंगाच्या वह्यांमध्ये श्रीतुकोबांच्या अभंगाच्याबरोबरच कान्होबांच्या अभंगांचाही समावेश आहे. अभंगवाणीत संस्कृत शब्दांचा भरणा आहे. त्यात जोश आणि विद्रोह आहे, ते देवाशीही दोन हात करावयास मागेपुढे पाहात नाहीत. त्यांनी घराण्याची परंपरा अव्याहतपणे सुरू ठेवली, आषाढी–कार्तिकी वारीचा सोहळा प्रतिवर्षी अधिकाधिक व्यापक केला, तुकोबांचे प्रयाणाचा प्रसंग, बंधूच्या आणि सहकार्यांच्या वियोगाचे दुःख बाजूस सारले आणि वारीची परंपरा चालू ठेवली. विश्वंभरबाबांच्या पूर्वजांपासून तुकयाबंधू कान्होबापर्यंत घराण्यात अखंड चालू असलेल्या पंढरपूरच्या आषाढी पायी वारीची परंपरा सुमारे 341 वर्षांची आहे. हा भक्तीचा अनुपम सोहळा स्वर्गातसुद्धा नाही, अशी समस्त विठ्ठल भक्तांची व वारकऱ्यांची सश्रद्ध भावना आहे.

# श्रीमंतापेक्षा गरीबात मानवता अधिक असते...

श्रीमंताची आणि गरीबाची तुलना करून माणुसकी कोणात जास्त आहे? हे जर पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, श्रीमंतापेक्षा गरीब माणसात माणुसकी जास्त पाहायला मिळते. गोरगरिबांना मदत करण्यात, दुःखी व पीडितांना मायेचा आधार देण्यात, सामाजिक व धार्मिक कार्यात धावून जाण्यात आणि दारावर आलेल्या भिक्षूंना दानधर्म करण्यात श्रीमंतापेक्षा गरीब म्हटले जाणारे लोक आघाडीवर असतात. त्यांना माणुसकीच्या नात्याने इतरांना मदत करणे आवडते. माणुसकीचे काही गुणधर्म त्यांच्यात ठासून भरलेले असतात. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील लोकांमध्ये, विशेष करून गरिबांमध्ये ही मानवता अधिक प्रमाणात पाहायला मिळते. पण श्रीमंतात माणुसकीचे कोणतेच गुणधर्म आढळत नाहीत. पैशापुढे व संपत्तीपुढे त्यांच्यातील माणुसकी रसातळाला गेलेली असते. म्हणून त्यांच्यात कसलाच माणुसकीचा लवलेश आढळत नसतो. आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करणे, आपले राहणीमान व आपला पोशाख तसेच आपल्या बोटातील व गळ्यातील सोनेचांदी इतरांना रुबाबात दाखवण्यात हे लोक फार पुढे असतात. ते जाईल तिथे आपल्या श्रीमंतीचा मोठेपणा मिरवतात. श्रीमंताच्या घरी आलेल्या पाहुण्यांची म्हणावी तेवढी सोय कधीच होत नाही. ते आलेल्या पाहुण्यांना साधा नमस्कार सुद्धा घालत नाहीत. नुसता चहापान करून काढून द्यायचे बघतात. त्यांना आपुलकीने दोन घास जेवण्याचा देखील आग्रह करत नाहीत. आणि जरीही जेवायला केले तर भरपेट खाऊ घालत नाहीत. पाहुण्यांना अर्ध्या पोटाने उठावे लागते. त्यांना आलेले पाहुणे बोज वाटायला लागते. म्हणून ते पाहुण्यांना लवकर काढून देण्याचे बघतात. दोन–तीन दिवस राहणे तर सोडाच, त्यांना एक दिवस राहणे सुद्धा जड जाते. पण याउलट गरिबांच्या घरी आलेल्या पाहुण्यांची यथोचित सोय होते. आलेल्या पाहुण्यांचे आदराने स्वागत केले जाते. चहापान करून त्यांना जेवण्यास आग्रह केला जातो. ते जेवण केल्याशिवाय पाहुण्यांना कधीच परत जाऊ देत नाहीत. ते पाहुण्यांना भरपूर खा म्हणून आग्रह करतात. त्यांना नको नको म्हटले तरी भरपूर जेवण वाढतात. जेवण झाल्याच्या नंतर ख्यालीखुशाली विचारून एकमेकांच्या गावाकडील नव्याजुन्या गोष्टींना उजाळा देतात. म्हणजे या गरिबांना आलेल्या पाहुण्यांबद्दल खूप अप्रूप वाटते. ते त्या पाहुण्यांना दोन–चार दिवस राहा म्हणून आग्रह करतात. म्हणजे त्यांना आलेले पाहुणे लवकर परत जाऊ नये असे वाटते. ते घरी आलेल्या पाहुण्यांना देवासमान समजतात, म्हणतात ना अतिथी देवो भव, याचा प्रत्यय आपल्याला अशा गरीबांच्या घरांमध्ये पाहायला मिळतो. श्रीमंत लोक खूप गर्विष्ठ आणि अहंकारी असतात. ते स्वतःला खूप महान व श्रेष्ठ समजतात. आणि गरिबांना कमी लेखून त्यांची टिंगल टवाळी करतात. गरिबांच्या लग्नाला न जाणे, गरिबांच्या अंत्यविधीला न जाणे, गरिबांच्या कोणत्या कार्यक्रमाला न जाणे, हे गुण त्यांच्यात हमखास पाहायला मिळतात. गरिबांच्या कार्यक्रमाला व अंत्यविधीला जाणे त्यांना अपमानास्पद वाटते. पण श्रीमंताच्या कार्यक्रमाला व अंत्यविधीला जाणे त्यांना प्रतिष्ठेचे लक्षण वाटते. म्हणून हे लोक आपल्यापेक्षा श्रीमंत लोकांच्या लग्नाला वा कार्यक्रमाला हमखास जातात. कारण तिथे प्रतिष्ठित मंडळींचा सत्कार केला जातो. त्यांना सर्वसामान्य व गरीब लोकांपासून वेगळे बसवले जाते. या श्रीमंत लोकांमध्ये असणारी एक गोष्ट मला खूप खटकते, ती म्हणजे अंत्यविधीला गेल्यावर हे लोक स्नान करून, जेवण करून आणि पांढऱ्या शुभ्र कपड्यामध्ये अंत्यविधीत सामील होतात आणि आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन करतात. आणि दहनभूमीवर गेल्यावर तिथे मौन न पाळता आपसात चर्चा करतात आणि हसतात पण! आपण कशासाठी आलोय आणि आपण काय करतोय? याचे भान देखील या श्रीमंतांना नसते. एवढे निसाक वृत्तीचे हे लोक असतात. श्रीमंताचे आईवडील कैलासवासी झाल्यावर सुद्धा हे लोक वरील प्रमाणेच वागतात. त्यांना ना कशाची लाज, ना कशाची लज्जा! दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आई–वडिलांची काळजी घेण्यात श्रीमंत मुलापेक्षा गरिब मुलाचाच वाटा अधिक असतो. श्रीमंत घरातील आई–वडीलांची काळजी घेण्यात ही श्रीमंत मुले कमी पडतात. आई–वडिलांची सेवा करण्यात कुचकामी ठरतात. श्रीमंतांना आईवडील बोज वाटायला लागतात. आईवडील कधी कैलासवासी होतील आणि आपल्या मागील दगदग कधी कमी होईल, असे त्यांना वाटते. पण गरीब घरातील मुले आई–वडिलांची काळजी घेण्यात व त्यांचे योग्य पालन पोषण करण्यात सिंहाचा वाटा उचलतात. आई–वडिलांमुळे घराला घरपण येते, याची त्यांना चांगली जाण असते. म्हणून ते आई वडिलांना जीवापाड जपतात. त्यांना वेळेवर जेवण देणे, त्यांचा वेळेवर दवाखाना करणे आणि त्यांना काय हवे आणि काय नको? हे बघणे ते आपले कर्तव्य समजतात. म्हणून अशा गरीब मुलांना मनापासून सलाम करावा वाटतो. रस्त्यावर एखादा अपघात झाला आणि त्या अपघातग्रस्त रुग्णांना दवाखान्यात नेण्यासाठी हे श्रीमंत म्हटले जाणारे लोक एखादी गाडी बघून त्या अपघातग्रस्त रुग्णांना रुग्णालयात दाखल न करता व्हिडिओ करण्यात मश्गूल असतात पण माणुसकीच्या नात्याने एखाद्या गाडीमध्ये टाकून त्या अपघातग्रस्तांना त्वरित रुग्णालयात दाखल करण्याची त्यांची मानसिकता नसते. तो अपघाताचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करणे आणि बघ्याची भूमिका घेऊन तिथून निघून जाणे या गोष्टी श्रीमंत लोक हमखास करतात. पण गरीब म्हटले जाणारे लोक बघ्याची भूमिका कधीच घेत नाहीत. रोडवर जात असताना एखाद्या व्यक्तीचा अपघात झाला तर हे गरीब म्हटले जाणारे लोक त्या अपघातग्रस्त व्यक्तींना माणुसकीच्या नात्याने त्वरित रुग्णालयात नेऊन त्यांना दाखल करतात. आणि त्या अपघातग्रस्त रुग्णांचा जीव वाचवतात. एवढे महान कार्य हे गरीब लोकच करू शकतात. कारण त्यांच्यात मानवता पोतप्रोत भरलेली असते.म्हणजे श्रीमंतापेक्षा गरिबांमध्ये माणुसकी ठासून भरलेली असते. याचा प्रत्यय आपल्याला अशा माणुसकी दर्शवणाऱ्या प्रसंगातून होतो. दारावर आलेल्या भिकाऱ्याला दानधर्म करण्याची दानत श्रीमंतात कधीच नसते. ते दारावर आलेल्या भिकाऱ्याला दानधर्म तर करतच नाहीत. उलट त्यांचा अपमान करून त्यांना घराबाहेर काढतात आणि घरात पोसलेल्या कुत्र्याला मात्र काजू, बदाम, पिस्ता व दूध खाऊ घालतात. म्हणजे माणसापेक्षा त्यांना कुत्रा मौल्यवान वाटतो. एवढी अमानुषता या श्रीमंत लोकांमध्ये ठासून भरलेली असते. म्हणून अशा लोकांचा मला खूप तिरस्कार वाटतो. म्हणून बांधवांनो या श्रीमंत लोकांवर कधीच विश्वास ठेवू नका... यांच्यावर कोणती आशा–अपेक्षा ठेवून जगू नका... हे भविष्यात आपल्याला मदत करतील हा गैरसमज काढून टाका. हे श्रीमंत लोक आपल्याला मदत तर करतच नाहीत पण उलट आपल्याला गोड गोड बोलून आपलेच खाऊन जातात आणि मग मात्र आपल्याला विसरतात. आपली जेव्हा गरज पडेल तेव्हा आपल्याला जवळ करण्याचा प्रयत्न करतात. यांच्यात मानवता तर नसतेच पण यांच्यात अमानुषता व स्वार्थीपणा ठासून भरलेला असतो. खरंतर आपणच या श्रीमंतांना डोक्यावर घेतो आणि यांच्या मोठेपणाचे गोडवे गातो. यांना मोठेपणा देणे व यांची किंमत करणे अगोदर बंद करा... आपोआप हे लोक माणसात येऊन, माणुसकीने वागतील..

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर
जिल्हा लातूर
मो.7498715661

## प्रबोधन

# स्वावलंबी युवा । देशाचा आधार

आज मूल काही सांगण्याआधी अधीर, लोभी पालक तो कोण होणार, ते सांगतात. हा डॉक्टर होणार आहे, हा इंजिनीयर होणार आहे, हा आय.ए.एस. होणार आहे आणि पालकांचं उत्तर ऐकून दडपणाखाली वावरणारं बिचारं मूल ओशाळवाणं हसत नाइलाजाने होकारार्थी मान हलवतं. स्वार्थानं पछाडलेल्या अशा पालकांचं प्रबोधन करताना प्राचार्य शिवाजीराव भोसले म्हणतात,' तू कोण होणार? असं मुलांना विचारू नये. जे त्यांना करता येईल ते करू द्यावं, जे होता येईल ते होऊ द्यावं. फक्त तत्त्व सोडू नको, सत्त्व विकू नको, असं साकडं त्यांना घालावं.' वास्तविक, प्राथमिक शिक्षण संपल्यावर मुलांची नैसर्गिक आवड, मनाचा स्वाभाविक कल अभिरुची चाचण्या (Aptitude Rest) घेऊन ठरवण्याची व्यवस्था शिक्षणसंस्थांमध्ये असेल, तर पालक समंजस होतील. पण आपल्या देशातील शैक्षणिक वातावरण प्रदूषित होत आहे, याची कोणी काळजीच करीत नाही. एक शिक्षणतज्ज्ञ तर म्हणतात, 'पहिल्या काही क्रमांकांत येणं, टक्केवारीचा प्रमाणाबाहेर विचार करणं, ज्ञानापेक्षा मार्कांना महत्त्व मिळणं, व्यक्तिमत्त्वापेक्षा उत्तरपत्रिकेचं मूल्यांकन महत्त्वाचं वाटणं, हा शैक्षणिक आजार आहे.' हा आजार मुलांच्या आत्महत्यांच्या रूपाने प्रकट होणं, हे जास्त चटका लावणारं आहे.

मानवतावादी विचारवंत खलील जिब्रान पालकांना हितोपदेश करताना म्हणाले, 'पालकांमुळे मुलं जगात येतात, पण ती त्यांची मत्ता नसते, म्हणून त्यांच्यावर पालकांची सत्ता असू नये. मुलांना स्वतःचे पंख असतात आणि त्यांचं स्वतःचं आकाश असतं.' आजचे पालक हे लक्षात घेत नाहीत की, आजच्या त्यांच्या पाल्यांनी थोडा निश्चय केला, विधायक कामाची निवड केली, शेती, व्यापार, संशोधन, लेखन, कलावृद्धी असं आपलं आवडीचे क्षेत्र निवडलं, धैर्यानं–स्थिरपणे आपल्या जीवनाला आकार दिला, तर ती स्वतःच्या पंखांनी गगनाला भिडल्याशिवाय राहाणार नाहीत. याचा अर्थच असा की, आज दिलं जाणारं, जिवंत प्रज्ञेला बधिरत्व आणणारं, टांग्याच्या झापडबंद घोड्यासारखं जीवनाच्या चाकोरीत अडकवणारं, हे शिक्षणच नव्हे. खरं शिक्षण हे स्वयंसिद्ध, स्वयंशिक्षण असतं. मुलांना मोठेपणा प्राप्त करून देणारं असतं. अभ्यासाविषयी आस्था, आरोग्याविषयी दक्षता, कर्मकौशल्याविषयी आग्रह आणि आनंदीवृत्तीची जपणूक, अशा वृत्ती– प्रवृत्तींनी ते जीवनाला समृद्ध, कृतिप्रवण आणि नित्यनूतन करणारं असतं. अशा शिक्षणातून घडलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वत्वाचा, पालकांच्या स्वत्वाशी संघर्ष होणं मग आपोआपच टळतं.

शिक्षणाच्या आधुनिक व्याख्येनुसार, 'वर्तन–परिवर्तन' (Change in behaviour) म्हणजे शिक्षण.' वर्तनवादी शिक्षणतज्ज्ञ डॉ.वॉटसन म्हणत असत की, 'काही नवजात बालकं माज्या हवाली करा. त्यांना हवं ते रूप मी देऊ शकतो.' असाच प्रयोगनिष्ठ आशीर्वाद भारताचे थोर इहवादी विचारवंत स्वामी विवेकानंद वारंवार व्यक्त करीत. ते म्हणायचे, 'मला हवे तसे शंभर तरुण द्या. मी तुम्हाला भारताचं चित्र बदलून दाखवतो.' पण आपल्या पालकांनी आणि पाल्यांनी विवेकानंदांचे विचार मनावर घेतलेच नाहीत, त्यामुळेच विद्यार्थ्यांचं भवितव्य हा पालकांच्या चिंता वाढवणारा विषय झाला आहे. जन्मापासून जे मूल पालकांच्या देखरेखीखाली असतं, त्याचं वळण घडतं आहे की, बिघडतं आहे, हे पालकांना कळू नये, हा विषय सखेदाश्चर्य व्यक्त करण्यासारखा आहे. खरं तर, मूल जसजसं एकेक इयत्ता पार करेल, तसतशी त्याच्या जाणिवेची स्पंदनं सुरू झाली की नाही, ते समाजशील, विचारशील होत आहे की नाही, हे पालकांनी बारकाईने पाहिलं, तर त्याच्या भवितव्याचा मार्ग ते स्वतःच शोधेल आणि त्याबद्दल पालकांना व्याकुळ, चिंताकातर होण्याची गरज राहाणार नाही.

अनुभववादी शिक्षणतज्ज्ञ जॉन लॉक म्हणत असत, 'मुलांच्या मनाची पाटी मुळात कोरी असते. अनुभवाची पेन्सिल जशी फिरत राहाते, तशी अक्षरं तिच्यावर उमटत राहातात. ' अनुभवांच्या या अक्षरांमधूनच मुलांच्या अभिरुचीचं संवर्धन होत जातं. असा स्वतःच्या अभिरूचीने संपन्न पाल्य आपल्या भावी जीवनाविषयी पालकांशी अचूक शब्दांत बोलू शकतो, संवाद करू शकतो. पालकांनी फार तर त्याच्या नियोजित उपक्रमातील अनुचित, धोक्याच्या, असामाजिक बाबींविषयी शक्य तितकं मार्गदर्शन करायला हरकत नाही. पण त्याच्या मार्गात बदल करण्याचा विचारही त्यांनी मनात आणू नये. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे व्यक्तित्व विकास आणि बौद्धिक विकास यांच्या समतोल विकासावर भर देतात, हे पाल्य– पालक दोघांनीही समजून घ्यावं. ते म्हणतात, 'शील, करुणा, विद्या, मैत्री आणि प्रज्ञा या पंचतत्त्वांनुसार प्रत्येक विद्यार्थ्याने आपलं चरित्र बनवलं पाहिजे.' एकांगी शिक्षणाने राष्ट्राला अपंगत्व येतं ते टाळावं. त्यासाठी लक्षात घ्या–

मातीच्या गोळ्याला । आकार द्या छान
होऊ दे महान । बालकाला ॥१
मातीला आकार । देतसे कुंभार
होई एकाकार । रचनेशी ॥२
कुंभाराची वृत्ती । हवी पालकात
तर नामवंत । होते मूल ॥ ३
तपस्वी शिक्षक` बाळा घडविती
गुण वाढविती । क्षणोक्षणी ॥४
बाळाचा 'कुमार' । होता थांबा सारे
पुत्र झाला बरे । मित्र आता ॥५
मार्गदर्शनाची । गरज न त्याला
नको सोबतीला । त्याच्या कोणी ॥६
नव्या क्षितिजाच्या । शोधात जाऊ दे
यश संपादू दे । एकट्याला ॥७
स्वावलंबी युवा । देशाचा आधार
देशाचा आजार । परावलंबी ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर–416012
92258 09071

# लोकमंगल कृषी महाविद्यालया मार्फत कौठाळी येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार संपन्न

**वडाळा (कटूसत्य वृत्त):–** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित आणि महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी महाविद्यालय वडाळा यांचे मार्फत दिनांक २१ जून रोजी मौजे कौठाळी ता. उत्तर सोलापूर येथे समृद्ध गाव योजने अंतर्गत दहावी आणि बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सदरील सत्कार समारंभाचे आयोजन कौठाळी विद्यालय कौठाळी येथे करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून गावातील ज्येष्ठ नागरिक लहू आबा घोडके, प्रमुख अतिथी शिक्षणप्रेमी तानाजी माने, राजेंद्र माने, रोहिणी माळी, सविता माळी, समाधान घोडके, प्रशांत भोसले, बापूराव शिरसट आणि शाळेचे मुख्याध्यापक सुरवसे सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक मांडताना कौठाळी विद्यालयाचे वरिष्ठ शिक्षक सिरसट सर यांनी लोकमंगल कृषी महाविद्यालयातर्फे नियमित स्वरूपात ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांकरिता घेतल्या जाणाऱ्या अशा स्वरूपाच्या कार्यक्रमाबद्दल मनस्वी आभार व्यक्त केले. यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष लहू आबा घोडके आणि प्रमुख पाहुणे तानाजी माने यांचा बुके आणि रोप देऊन मुख्याध्यापक सुरवसे सर यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. कौठाळी गावातील शैक्षणिक वर्ष २४–२५ मध्ये दहावी आणि बारावी मध्ये उत्कृष्ट गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींना याप्रसंगी विठ्ठल रुक्मिणी मूर्ती, वह्यांचा संच, प्रमाणपत्र आणि रोप भेट देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. इयत्ता दहावी मधुन या यथोचित सन्मानाचे मानकरी करण समाधान घोडके, प्रगती लक्ष्मण माळी, सानिका बापुराव सिरसट, स्मर्णिका प्रशांत भोसले आणि वैष्णवी अमोल



घोडके हे ठरले. तर इयत्ता बारावी मधून गावाचे नाव लौकिक करणाऱ्या विद्यार्थिनी दीक्षा रामेश्वर माने, श्रद्धा तानाजी माने, मिनाज दादासो सय्यद, आकांक्षा फुलचंद खडके आणि अपेक्षा अविनाश भोसले यांचा देखील सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमास लाभलेल्या सविता माळी आणि रोहिणी माळी यांनी लोकमंगल कृषी महाविद्यालयाच्या उपक्रमाचे विशेष कौतुक केले आणि सर्वच विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात प्रामाणिकपणे अभ्यास करून गावाचे नाव उज्वल करावे अशी भावना व्यक्त केली. शाळेतील उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अजित कुरे यांनी सदरील कार्यक्रम आयोजना मागची महाविद्यालयाची भूमिका विशद करून पुरस्कार प्राप्त सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना पुढील वाटचालीसाठी मनस्वी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय मनोगतामध्ये ज्येष्ठ नागरिक लहू आबा घोडके यांनी लोकमंगल समूहाचे उपक्रम हे निसर्ग आणि कृषी क्षेत्राशी नाळ जोडून ठेवणारे असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी देखील निसगार्चा समतोल राखण्यासाठी प्राप्त केलेल्या ज्ञानाचा वापर करावा असा मौलिक सल्ला त्यांनी याप्रसंगी दिला आणि गुणवंत विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देखील दिल्या. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कौठाळी विद्यालयाचे वरिष्ठ शिक्षक सिरसट सर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी लोकमंगल कृषी महाविद्यालया मार्फत नुकत्याच पार पडलेल्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थ्यांना सीड बॉल चे वाटप करण्यात आले तसेच शाळेतील परिसरात आंबा, चाफा, शेवरी इत्यादी वृक्षांचे वृक्षारोपण राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांद्वारे करण्यात आले. कौठाळी विद्यालय कौठाळी येथील इयत्ता दहावी मध्ये शिकत असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना लोकमंगल कृषी महाविद्यालयाद्वारे वह्यांचे वाटप देखील करण्यात आले. गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजनासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. आमदार सुभाष बापू देशमुख, अध्यक्ष रोहनजी देशमुख, सचिव डॉ. अनिता ढोबळे आणि लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजन व संपन्नतेसाठी प्रा. अजित कुरे, डॉ. विजयाराणी दावणे आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

## वात्रटिका

### मला नोबेल मिळावे

युद्ध थांबवले म्हणणारे
आता युद्धात उतरले...
खाण्याचे नि दाखवायचे
दात वेगळेच दिसले...
मनोमन इच्छा उफाळली
शांततेचे नोबेल मिळावे...
हल्ली हल्ला शांततेसाठी
येवढेच म्हणे जगाला कळावे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

पान १ वरून

# महास्वच्छता अभियानातून...


पालकमंत्री गोरे यांनी दिली. तसेच सर्व मानाच्या पालख्या सह अन्य पालख्या, दिंड्या यांचे प्रस्थान पंढरपूरसाठी झालेले आहे. आषाढी यात्रा सोहळ्यासाठी पंढरपूर येथे आल्यानंतर या सर्वांना सर्वोच्च व्यवस्था प्रदान केली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच या मोहिमेत सहभाग घेतल्याबद्दल जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिका आयुक्त यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, सामाजिक संस्था, नागरिक व स्वयंसेवक यांचे त्यांनी कौतुक केले.

आमदार सचिन आवताडे यांनी पालकमंत्री महोदयांनी त्यांच्या संकल्पनेतून वारी पूर्वी पंढरपूर शहर स्वच्छ करण्यासाठी राबवलेल्या महा स्वच्छता अभियानाचे कौतुक केले व वारी संपल्यानंतर ही अशी मोहीम राबवण्याची मागणी केली.

प्रारंभी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी प्रास्ताविकात स्वच्छता अभियानाचे महत्त्व सांगून प्रशासनाच्या वतीने येथे येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा देण्याबरोबरच शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सर्वोत्तपरी प्रयत्न केले जाणार असल्याचे सांगितले. तर मोहिमेत सर्वांनी सहभाग घेतल्याबद्दल मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी आभार मानले.

# श्री.शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूल मध्ये योग दिवस उत्साहात साजरा

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):–** श्री.शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूल मध्ये सर्वांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला. यावर्षी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला, ज्याची थीम "एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग" अशी आहे. या दिवसाला अत्यंत मोठे महत्व देखील आहे. खरं तर, योग हा भारताने जगाला दिलेला अमूल्य वारसा आहे. निरोगी शरीरासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी योगा खूप महत्त्वाचा असतो. यामुळे शरीर तंदुरुस्त राहण्यासोबतच हाडे मजबूत होण्यास मदत होते.मुळात म्हणजे योगा कोणत्याही एका दिवसासाठी नव्हे तर दररोज करणे महत्वाचे आहे. योगा केल्याने आरोग्याच्या अनेक समस्या दूर होण्यासही मदत होते. मानवी जीवनात



योगाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. योगाभ्यासामुळे मानवी जीवनात शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक पातळीवर अनेक सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होते.

क्रीडा शिक्षक आबासाहेब राऊत यांनी सर्वांना योगाभ्यास शिकवला. यामध्ये सूर्यनमस्कार, वृक्षासन, ध्यान, वज्रासन, अनुलोम विलोम, कपालभाती इत्यादी. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी देखील आनंदाने शिकवलेले योग पूर्ण केले. मुख्याध्यापक संजय इंगोले यांनी सर्वांना योगाचे महत्त्व पटवून दिले व सतत योगा करण्यास प्रोत्साहन दिले. शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व इतर कर्मचारी आंतरराष्ट्रीय योग दिवसाला उपस्थित होते.

या कार्यक्रमास श्री.शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूल च्या डायरेक्टर प्रियंका देशमुख मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# ‘एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी’ हजारोंच्या संख्येने सोलापूरकरांनी केला योग



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):–** योग हा ध्यान आणि व्यायामापुरतता मर्यादित नसून अध्यात्माच्या सर्व प्रकारच्या शक्यतांची ओळख करून देणारे अत्यंत प्राचीन असे शास्त्र आहे. भारताला याचा अत्यंत समृद्ध वारसा लाभला आहे. योगाच्या परंपरेचे संवर्धन आणि जतन केले पाहिजे, योगाला आपल्या दैनंदिन जिवनाचा अविभाज्य भाग बनवा असे, आवाहन ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी आज येथे अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या कार्यक्रमात केले.

सोलापूरातील हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्युरो, सोलापूर, जिल्हा व पोलीस प्रशासन आणि योग्य समन्वय समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात पोलीस अधीक्षक कुलकर्णी बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निराळी, क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपजिल्हाधिकारी अंजली मरोड, तहसिलदार श्रीकांत पाटील, शिक्षणाधिकारी कादर शेख, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी असिफ मुलाणी, उपशिक्षणाधिकारी विठ्ठल ढेपे, ह.दे.प्रशालेच्या मुख्याध्यापिका दीपा पाठक, उपमुख्याध्यापक मोतीबाने, तालुका क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे, योग दिवस समन्वय समितीचे सदस्य मनमोहन भुतडा, रोहिणी उपळाईकर, नंदकुमार चितापुरे, अशोक गरड, रघुनंदन भुतडा, डी पी चिवडशेट्टी, संगीता जाधव, सेवानिवृत्त अधिकारी सतीश घोडके आणि कार्यालय सहायक जे एम हन्नुरे आदी उपस्थित होते.

योग केवळ आसनांची मालिकाच नाही, तर शरीर, मन आणि आत्मा याचं एकत्रित स्वरूप आहे. योग दिन म्हणजे आपल्या जीवनशैलीकडे नव्यान पाहण्याची, अंतर्मुख होण्याची आणि आपणास लाभलेल्या या अनमोल परंपरेचा सन्मान करण्याची संधी असल्याचे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह यांनी केले.

यावेळी प्रास्ताविकामध्ये यादव म्हणाले, एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग ही यावर्षी योग दिनाची संकल्पना असून यंदाचे ११ वे वर्ष आहे. महाराष्ट्र मध्ये प्रथमच शहरातील सर्व योग संस्थानी एकत्रितपणे हजारोंच्या संख्येने योग दिन उत्साहात साजरा करत असल्याचे सांगितले.

यावेळी नृत्य निरंजन भरतनाट्यम डान्स अकॅडेमीची शिक्षिका जान्हवी दुदगीकर, वृद्धी कोठारी, नंदिनी बागडे, प्राप्ती गुजर, सौम्या बाकळे, श्रद्धा तोडामे, श्रुती भिंगे, पद्मश्री कोळी, अक्षरा वाघमोडे, द्रिती यमपल्ली, साक्षी कुलकर्णी, रामा पिंपळनेरकर, श्रुती माने आदींनी नृत्य योगाच्या माध्यमातून अतिशय अवघड अशी योगासने करून उपस्थितांची मने जिंकली. अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या सुरुवातीला जितेंद्र महामुनी, संतोष सासवडे, सोनाली जगताप व विद्या होनमुडे यांनी शंख वादन करून योगाभ्यासाची सुरुवात केली. आयुष्य मंत्रालयाने नेमून दिलेल्या प्रोटोकॉल प्रमाणे सुरुवातीला भारतीय योग संस्थेच्या कांचना श्रीराम, संगीता बिराजदार, रितू कटकधोंड, अनिता कुलकर्णी, सरोज लोंढे आरती आमनगी यांनी शिथिली करण्याचे व्यायाम घेतले. योग साधना मंडळाच्या वतीने रोहिणी उपळाईकर, जयश्री उमरजीकर, प्रियांका झिंगाडे, धनश्री देशपांडे, डा.मेघःश्याम साखरे, संतोष खराडे, योगीराज कलुबर्मे यांनी उभी आसने घेतली व योग सेवा मंडळाच्या वतीने वासंती निंबाळकर, जितेंद्र महामुनी कालिदास कोंडा, सोनाली जगताप व विद्या होनमुडे यांनी बैठे आसने घेतली. पोटावरील झोपून करावयाची आसने सर्वोदय योग मंडळाचे धनश्री कुलकर्णी, जीवन कुमार अवताडे, बसवराज कराळे, सत्यवान कदम, राजेश्वरी आवताडे, गायत्री कदम यांनी घेतली. विवेकानंद केंद्राच्या वतीने रवी कंटली, हरीश टवाणी, प्रेरणा टवाणी, वेदांत कोमल मेरगु यांनी पाठीवरील योगासने घेतली. पतंजली योग पिठाच्या वतीने रघुनाथ बनसोडे यांनी प्राणायाम घेतले. गीता परिवाराच्या वतीने संगीता जाधव यांनी ध्यान धारणा घेतली.

यावेळी योग समन्वयक मनमोहन भुतडा लिखित सुखी जीवनाचा कानमंत्र या योग विषयावरील पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. यावेळी घेण्यात आलेल्या योगगुरू स्पधेर्तील उमा झिंगाडे, रघुनाथ क्षीरसागर, बाळासाहेब पाटील, विद्या होनमोडे आणि रवी कंटली यांना उपस्थितांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच निबंध स्पधेर्तील विजेते नर्मदा कनकी, स्मिता देशपांडे आणि मानसी मोकाशी यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता शहा यांनी केले. मनमोहन भुतडा यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीपासूनच सोलापूर शहरातील पोलीस आयुक्तालयाचे सहायक पोलीस उपनिरीक्षक ए एम ठोसर यांच्या नेतृत्वाखाली ए बी माने, एस वाय, माने, आय डी मालदार, एस बी ठोसर, पी ए जाधव,एस बी खाते, के जी गावडे, एम बी गाब्वान आणि एस आर साळुंखे या पोलीस बँड पथकाने अतिशय सुरेख देशभक्तीपर गीत गायन केले. तसेच योग संचालनाच्या वेळी धून वाजवून उपस्थितीना मंत्रमुग्ध केले.

सदरील कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी सकाळी सहा पासूनच उपस्थितांनी गर्दी केली होती. यावेळी पोलीस प्रशिक्षण केंद्राचे ओमाजी सातपुते, आनंद पेद्याला, प्रवीण शिवशरण, युवराज राठोड, तानाजी शिंदे, राज्य राखीव पोलीस दल १० चे पोलीस उपनिरीक्षक आर डी पवार, जिल्हा होमगार्ड कार्यालय, एन सी सी बटालियन 9, भारत स्काउट गाईडचे श्रीधर मोरे, अनुसया सिरसाठ, योग सेवा मंडळ, योग साधना मंडळ, विवेकानंद केंद्र, गीता परिवार, सर्वोदय योग मंडळ, योग प्रभा मंडळ, अखिल भारतीय योग संस्थान आणि पतंजली योग पिठ,अण्णाप्पा काडादी हायस्कूल, शिवाजी प्रशाला, नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशाला, सिध्देश्वर कन्या प्रशाला आणि हरिभाई देवकरण प्रशालेचे विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# वादळी वाऱ्या मुळे शेतकऱ्याचे सोलार ऊर्जाचे संचाचे मोठे नुकसान



**अकोला (कटूसत्य वृत्त):–** मुर्तीजापुर पंचायत समिती अंतर्गत ग्राम शिरसो से शिवारात शेतकरी मदन मोहनलाल दुबे यांच्या शेतातील गट नंबर 322 /1 शिरसो भाग दोन मधील दिनांक 19/6/25 अचानक दुपारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसामुळे त्यांच्या शेतातील सौर ऊर्जा संचाचे वाऱ्यामुळे तुटतात झाले आहे. त्यामुळे ऊर्जा संचाचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यांनी त्यांच्या शेतात सौर ऊर्जा संच दिनांक 28 /9/2020 रोजी सोपन सोलर पंप लिमिटेड पुणे या कंपनीचे सोलर ऊर्जा संच लावण्यात आले. त्यांचा आयडी नंबर. 501333210022663 हा असून तुटलेल्या सौर ऊर्जा प्लेट व संपूर्ण इस्टिमेट क्षितिजाग्रस्त असल्यामुळे त्यांनी आपल्या शेतात रब्बी हंगामासाठी कापूस तूर, सोयाबीन या पिकांची पेरणी केली असून. त्यांच्या विहिरीला मुबलक पाणी असून सुद्धा त्यांना सिंचनापासून वंचित राहावे लागत आहे. तरी सोपंन सोलर ऊर्जा कंपनीकडून या सोलर संचाची दुरुस्ती करून त्यांना सिंचनाची उपलब्ध करून द्यावी अशी मागणी शेतकऱ्याने कंपनीला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. तरी सोपान सौर ऊर्जा कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अनगर विद्यालयात योगाचे प्रात्यक्षिके



**अनगर (कटूसत्य वृत्त):–** अनगर येथील कै.शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम राष्ट्रगीत व राज्य गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.या कार्यक्रमानिमित्त योग शिक्षक हनुमंत बंडगर गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने व त्याचे फायदे यांचे प्रात्यक्षिकासह सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य चंद्रकांत ढोले होते. तसेच उपप्राचार्य महादेव चोपडे आणि पर्यवेक्षक माधव खरात यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध योगासने सादर केली.योग दिनाच्या आयोजनामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून, नियमित योगाभ्यासाच्या गरजेवर भर देण्यात आला.

यावेळी बब्रुवान बोडके, रवींद्र बोडके, दाजी गुंड, चंद्रकांत सरक, हरी शिंदे, अर्चना गुंड, पंढरी थिटे, कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक माधव खरात यांनी केले तर आभार सोमनाथ ढोले यांनी मांडले जागतिक योग दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार वाटप करण्यात आला.

# लोकमंगल समृद्ध गाव योजनेंतर्गत रानमसले येथे वृक्षारोपण अभियान संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून समृद्ध गाव योजनेंतर्गत मौजे रानमसले ता. उत्तर सोलापूर येथे वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. या अभियानाची सुरुवात रानमसले गावचे सरपंच मनोहर क्षीरसागर व उपसरपंच रमेश सुतार यांच्या हस्ते श्री ज्योतिबा मंदिर परिसरात गुलाबाचे रोप लावून करण्यात आली. याप्रसंगी गावातील सर्व ग्रामस्थ व सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. मंदिर परिसरात एकूण 13 झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर ब्रम्हगायत्री विद्यामंदिर कृषी व कनिष्ठ महाविद्यालय येथील परिसरात प्राचार्य गवळी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून अभियान राबविण्यात आले. त्यानंतर ब्रह्मगायत्री विद्यामंदिर महाविद्यालयाच्या परिसरात गुलाबाचे व चिंचेची झाडे लावून वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालय परिसरात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या हस्ते एकूण 12 झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये ब्रह्मगायत्री विद्यामंदिर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी लावलेल्या रोपांचे संवर्धन करण्याची जबाबदारी घेतली. या अभियानात सर्व स्वयंसेवकानी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हे अभियान राबविण्यासाठी प्राचार्य सागर महाजन, प्राचार्य गवळी, सरपंच मनोहर क्षीरसागर, उपसरपंच रमेश सुतार व रानमसले ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# सोलापूर विमानतळावर आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग शिबिर संपन्न



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सोलापूर होटगी रोड विमानतळावर एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया ने आंतरराष्ट्रीय योग दिना निमित्त योग शिबिराचे आयोजन केले होते . त्यानिमित्त योग प्रशिक्षक सौ.उन्मनी जांगे, सौ.जोस्ना दुसाल व अभय दुसाल यांनी विमानतळावरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना आज सकाळी सहा ते सातच्या दरम्यान योगाचे प्रशिक्षण दिले. सर्व सहभागी कर्मचाऱ्यांना प्रमुख पाहुणे व सोलापूर विचार मंचचे डॉ. संदीप आडके व डॉ. डायना आडके यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रके देण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सोलापूर विमानतळाच्या प्रमुख अंजनी कुमारी यांनी योग प्रशिक्षक उन्मनी जांगे, जोस्ना दुसाल, डॉ. संदीप आडके व डॉ. डायना आडके यांचे स्वागत केले. या योग शिबिरात सोलापूर होटगी रोड विमानतळावरील सर्व विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी व कॉन्ट्रॅक्ट वर्कर्स नी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

मानव संसाधन विभागाचे प्रबंधक दीपक केलूस्कर यांनी आभार प्रदर्शन केले व या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी श्रीमती अंजनी कुमारी सोलापूर विमानतळ प्रबंधक व त्यांच्या सहकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.


## मोहोळ नगरपरिषद,मोहोळ जिल्हा–सोलापूर

### ई – निविदा सूचना प्रसिद्धीकरण

जा.क्र.मोनप/बांध/२०२५/२८०

दि–२०/०६/२०२५

मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद यांचेकडून शासनाच्या विविध योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या विकास कामाची ई–निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार/अर्हताप्राप्त निविदा धारकाकडून तांत्रिक ब–१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई–निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई–निविदेमध्ये एकूण ०६ कामे आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि.२३/०६/२०२५ ते दि. ०१/०७/२०२५ पर्यंत सायं.०५.०० वाजेपर्यंत असून कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत, निविदा स्वीकृती,अटी व शर्थी इत्यादींची माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरती उपलब्ध आहे.

सही/–
(डॉ. योगेश डोके)
प्रशासक तथा मुख्याधिकारी,
मोहोळ नगरपरिषद, मोहोळ


# जागतिक ऑलिम्पिक डे दिनी राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार

**सोलापुर (कटूसत्य वृत्त):–** दिनांक 23 जून 1894 साली आंतर राष्ट्रीय ऑलिम्पिक समितीची स्थापना झाली या दिवशी आंतर राष्ट्रीय ऑलिम्पिक दिवस साजरा केला जातो. जगभरातील खेळाडूंना सर्वोत्कृष्ट बनविण्याच्या दृष्टीने, प्रोत्साहन देण्यासाठी व प्रवृत्त करण्यासाठी जागतिक ऑलिपिक डे साजरा केला जातो. या अनुषगांने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर यांच्या वतीने दि.23 जून 2025 रोजी सकाळी 07.30 वा. जिल्हयातील खेळाडूंचा व छत्रपती पुरस्कार विजेत्याचा सत्कार व क्रीडा विषयक आयोजन जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका सोलापूर येथे आयोजित करण्यात येणार असून सदर कार्यक्रमांस खेळाडूं, पुरस्कार्थी व क्रीडाप्रेमीनी उपस्थित राहावे. असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

तसेच जिल्हयातील प्रत्येक शाळा, महाविदयालये, विविध खेळाचे संघटना, एन.सी.सी., नेहरु युवा केंद्र, विविध सामाजिक संस्था, औदयगिक प्रतिष्ठाणे यामध्ये सदर ऑलिम्पिक दिन उपक्रमांचे आयोजन करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल, फोटो, जिल्हा क्रिडा कार्यालयास सादर करण्यात यावा. अशी माहिती जिल्हा क्रिडा अधिकारी सोलापूर यांनी दिली आहे.

# भारतीय स्टेट बँक ऑफ इंडियाच्या वतीने शेतकरी जागरूकता सप्ताहाचे आयोजन



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया अकलूज च्या वतीने तरंगफळ ता माळशिरस येथे कृषी ऋण जागृत सप्ताह (शेतकरी जागृत सप्ताह) आयोजित केला होता. तरंगफळ आणि परिसरातील शेतकरी बांधव या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अकलूज शाखेचे शाखा व्यवस्थापक धनंजय देशपांडे, उपशाखा व्यवस्थापक तुषार भोर, फिल्ड ऑफिसर मोनिका जांभळे, हर्षवर्धन चव्हाण, प्रवीण मोरे आदी बँकेचे पदाधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भारतीय स्टेट बँकेच्या वतीने नेहमीच शेतकरी हितासाठी वेगवेगळ्या योजना राबविल्या जातात व बळीराजाची उत्पादकता वाढवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केला जातो, या शेतकरी जागरूकता सप्ताहामध्ये किसान क्रेडिट कार्डचे तपशीलवार स्पष्टीकरण देण्यात आले. त्याचबरोबर पीक कर्जाची वेळेवर परतफेड करून, नूतनीकरण केल्यास सरकारकडून मिळणारी व्याज सवलत कशा पद्धतीने दिली जाते,याबाबतही माहिती देण्यात आली. याव्यतिरिक्त सामाजिक सुरक्षा योजना, संलग्न कृषी कर्जे शासकीय कृषी योजना अंतर्गत इतर कृषी संलग्न योजनांची माहिती देण्यात आली. पीक कर्ज, गुंतवणूक, किसान क्रेडिट कार्ड याबाबत माहिती देऊन शेतकऱ्यांचे समाधान करण्यात आले.

यावेळी तरंगफळ येथील कृषीनिष्ठ शेतकरी संजय वाघमोडे, भागवत तरंगे, लक्ष्मण गेंड, महादेव गोरड ,माणिक वाघमोडे, मनापा तरंगे, दिलीप वाघमोडे, यासह मान्यवर शेतकरी उपस्थित होते. यावेळी उपस्थित भारतीय स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मान तरंगफळ ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला.


## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109




(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एखादी गोष्टीची सत्यता पडताळण्यासाठी महत्त्वाचा ठरणारा आधार २) मनाची तळमळ ३) डोकेदुखीवरील मलम ४) मुस्लीम बांधवांचा एक सण ५) छ. शिवरायांचे सेनापती हंबीरराव मोहिते यांचे पूर्वीचे नाव ६) राष्ट्रवादीचे सुप्रिमो ७) हारच्या विरूध्दार्थी १०) फळातील गोड द्रव १३) अडचण १५) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो १७) आई (इंग्रजीत) १९) चवीला कडू २०) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात २३) भारतीय चलन २५) मावशीचे पती २५) चुळबुळ, हालचाल २७) एक आजार २९) सावलीच्या विरूध्दार्थी ३०) क्रिकेटमधील सिक्सर ३३) बारामतीचे आमदार ३६) कर्मचाऱ्यांना पगाराव्यतिरिक्त प्रवास तसेच इतर खर्चापोटी दिले जाणारे पैसे ३८) शपथ (हिंदीत) ३९) पगार ४०) पांडवांपैकी एक ४१) शूर योध्दा ४२) एकाग्र, मग्न ४४) एक हिंस्त्र प्राणी ४८) तव उलट लिहा ५०) शाहिराचे वाद्य ५१) तीन दुणे

**आडवे शब्द :** १) छ. शिवरायांची पत्नी
५) बदकाप्रमाणे दिसणारा पण रूबाबदार पक्षी
६) छ. शिवरायांच्या वडिलांचे नाव ८) क्रोध, संताप
९) मुस्लीम बांधवांची धार्मिक शिक्षण देणारी शाळा
११) एक म्हण–उथळ पाण्याला खळखळाट **
१२) श्री विष्णूचा एक अवतार १४) निर्जीवच्या विरूध्दार्थी
१५) धमकी देणे
१८) भाजपाचे केंद्रीय मंत्री–नितीन **** २१) शिक्षणानंतर मिळणारी डिग्री (मराठीत) २२) भगवान शंकराचे वाद्य २३) सतत, नेहमी २५) कावळ्याचे ओरडणे
२८) पर्जन्य ३१) हरणातील नर प्राणी ३२) अवकाशात सोडले जाणारे अंतरिक्ष वाहन
३४) समुद्राच्या पाण्याची लहर ३५) ळव उलट लिहा ३७) जवळ, समीप
३९) टाईम (मराठीत) ४०) नऊ गुणिले तीन ४३) फोटो (हिंदीत) ४४) युध्द थांबविण्यासाठी केलेली बोलणी ४५) एक विदेश मद्य ४६) मप उलट लिहा ४७) लग्नातील नवरा मुलगा ४९) सतत रडगाणे गाणारा
५१) छ. संभाजीराजांच्या मातोश्री ५२) नवऱ्याची दुसरी बायको
५३) प्रवास (हिंदीत)

## सुडोकु – 282

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 1 | | 9 | 7 | | 6 |
| | 5 | | | | 4 | | | 9 |
| | | | 8 | 3 | | 4 | 5 | |
| | 2 | | 6 | 4 | 7 | | | 5 |
| | 7 | | | | | | 6 | 1 |
| 8 | | 5 | 3 | 2 | 1 | | | 4 |
| | | | | 1 | | 5 | | 3 |
| 5 | 8 | | | 9 | | | 2 | |
| | 4 | 3 | 5 | | 2 | 1 | | |

# हेल्थ कॅपिटल ऑर्थोपेडिक आणि गायनॅक सुपर स्पेशालिटी चा मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आरोग्याच्या दृष्टीने सध्या नागरिक खूपच सेनसेटिव्ह झालेले आहेत. त्यांना योग्य सुविधा मिळावेत म्हणून सुप्रसिद्ध अशा सिटी हॉस्पिटल चे मार्गदर्शक डॉक्टर संजय दंतकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले असल्याचे डॉक्टर केतकी पाटील यांनी सांगितले.





सदर मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन जुना एम्प्लॉयमेंट चौक येथील सिटी हॉस्पिटल मध्ये सोमवार दिनांक 23 जून 2025 रोजी सकाळी 11 ते दुपारी तीन वाजेपर्यंत तपासणी सुरू असणार आहे. तसेच सर्व स्त्रीरोग व कृत्रिम सांधेरोपण गुडघ्याचे रोबोटिक तंत्रज्ञानाने मोफत तपासणी केले जाईल.

या शिबिरात प्रामुख्याने पुढील तपासण्या मोफत केल्या जातील यात ऑर्थोपेडिक, फिजिओथेरपी, हाडाची घनता आणि विटामिन डी तपासले जाईल. तसेच स्त्रियांकरिता अनियमित मासिक पाळी रक्तस्त्राव रजो निवृत्तीनंतरची अवस्था, गर्भधारणेतील गुंतागुंत, खालच्या ओटीपोटात वेदना, ल्युकोरिया (पांढरा स्त्राव पी व्ही) व कर्करोग स्क्रीनिंग अशा तपासण्यांचा समावेश आहे.

याकरिता नाव नोंदणी आवश्यक असून उमेश 98 22 50 32 99 लक्ष्मण 90 96 92 22 99 या क्रमांकावर संपर्क साधावा तसेच सोलापूर शहर व जिल्हा परिसरातील नागरिकांनी या मोफत शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉक्टर केतकी पाटील व अनिरुद्ध पाटील यांनी केले.

# विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांचा ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीनं जंगी सत्कार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र पिंपरी चिंचवड मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे आमदार तथा महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांचा ईच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीनं शनिवारी जुना एम्प्लॉयमेंट चौक येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीर्चे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीर्चे प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड यांनी फटाक्यांच्या आतिषबाजी करत जंगी स्वागत केले. दरम्यान अण्णासाहेब बनसोडे यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा, निळी मखमली टोपी, निळी शाल, पुष्पगुच्छ, सोलापूरची प्रसिद्ध चादर, कडक ज्वारीची भाकरी आणि शेंगा चटणी देऊन त्यांचं सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, डि. के.मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक दशरथ कसबे, उमेश जाधव, संतोष ऋतिक गायकवाड, अक्षय उर्फ सचिन जाधव, किरण शिंदे, अमोल जगताप, माऊली जरग, प्रथमेश पवार, सोनू पटेल, रोहन भडांगे, उत्कर्ष गायकवाड, अजिंक्य जाधव, कार्तिक जाधव, अजिंक्य शिंदे, फिरोज पठाण, आनंद गाडेकर, माणिक कांबळे,वसंत कांबळे, महादेव राठोड, दिनेश आवटे, तुषार गायकवाड यांच्यासह ईच्छा भगवंताची परिवाराचे पदाधिकारी सदस्य आदींची उपस्थिती होती. दरम्यान ईच्छा भगवंताची परिवाराचे संस्थापक लक्ष्मण मामा जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार सामाजिक संस्थेचे कार्य नेहमीच कौतुकास्पद आहे त्यांचे कार्य समाजाला दिशा आणि प्रेरणादायी देणारे आहे किसन जाधव आणि कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड यांनी राजकीय क्षेत्रात काम करत असताना सामाजिक कार्यात देखील त्यांचे कार्य मोलाचे असल्याचे मनोगत यावेळी विधानसभा उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांनी व्यक्त केलं.

# अनुभवाचा उपयोग समाजघटकांसाठी करावा - दत्तात्रय सावंत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बंदेनवाज शेख व चंद्रकांत साळुंके यांनी ३३ वर्ष ज्ञानदानाच्या क्षेत्रात काम केले.या सेवा कालावधीत अनेक अनुभव घेतले.या आलेल्या अनुभवाचा उपयोग विविध समाज घटकांसाठी करावा.असे आवाहन माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत सर यांनी केले.



बंदेनवाज शेख व चंद्रकांत साळुंके यांच्या सेवापुर्ती निमित्त सत्कार समारंभ कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर बाळकृष्ण दोड्डी,राम मुद्दे, संजय साळुंके आप्पासाहेब पाटील, गुरुनाथ वांगीकर, आप्पाराव इटेकर, सुनिल चव्हाण, वल्लभ चौगुले, शंकर वडणे, अ.गफुर अरब, नितीन जाधव, तस्लिमाबानो पठाण, पांडुरंग रोकडे आदी उपस्थित होते.हा कार्यक्रम हॉटेल समृद्ध येथे पार पडला. शिक्षण क्षेत्रात अनेक बदल होत आहेत.त्याला शिक्षकांनी आत्मविश्वासाने सामोरे गेले पाहीजे.असेही आवाहन दत्तात्रय सावंत यांनी केले.यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अतुल नारकर यांनी तर शिवानंद हिरेमठ यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विरभद्र यादवाड, भिमराया कापसे, जयंत गायकवाड, श्रीराम जाधव, बरगली लांडगे व विकास सुरवसे यांनी प्रयत्न केले.

# नेहमी सकारात्मक दृष्टिकोन ठेवा आणि स्वतःवर विश्वास ठेवा, यश तुमच्यासोबत असेल- रामेश्वर नाईक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सेवा फाउंडेशन आयोजित सेवा करिअरचा महाकुंभ काल सोलापूरच्या नेहरू नगर येथे पार पडला. माजी सहाय्यक आयुक्त तथा सेवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश राठोड यांनी आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा आणि करिअर मार्गदर्शन मेळाव्यात शेकडो विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून मुख्यमंत्री विशेष वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक, सोलापूरचे पोलीस आयुक्त एम राजकुमार, भाजपा शहराध्यक्षा सौ.रोहिणीताई तडवळकर, डॉ.श्रीमंत राठोड प्राचार्य मुंबई यांच्या सह शैक्षणिक सामाजिक धार्मिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



कार्यक्रमाची प्रस्तावना प्राचार्य डॉ.श्रीमंत राठोड यांनी केले, भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांनी शिक्षणाचा कास धरून आदर्श विद्यार्थी व्हा असे मार्गदर्शन केले. तर विद्यार्थ्यांनी आपल्या प्रयत्नात सातत्य ठेवले तर यश हमखास मिळेल असे प्रतिपादन रामेश्वर नाईक यांनी केले. विद्यार्थ्यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा करून यशाचे शिखर गाठले पाहिजे यश तुमच्या हातात आहे असे मोलाचे मार्गदर्शन सोलापूरचे कर्तव्यदक्ष पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी स्वतःचे अनुभव व्यक्त करत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली.

त्याच बरोबर आयोजक प्रकाश राठोड यांनी जिद्द चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर आपण ठरविलेले ध्येय गाठू शकतो. असे सांगून उत्तम भारतीय नागरिक होता येईल का? याचा देखील विचार करायला हवा असे मत व्यक्त केले.

त्या नंतर १० वी,१२ वी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पार पडला.

यावेळी विविध अकॅडमीचे प्रशिक्षणार्थी व त्यांचे संचालक देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सुप्रसिद्ध गायक आकाश चव्हाण यांनी शैक्षणिक व भक्ती गीतातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन सेवा फाउंडेशनचे प्रवक्ते मिथुन राठोड यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर सचिन चव्हाण शहर प्रमुख शिवसेना, माजी नगरसेविका अश्विनी चव्हाण, मा.नगरसेविका शैलजा राठोड, नगरसेविका सौ. राजश्री चव्हाण, भाजपा सदस्या संपदा जोशी, ज्येष्ठ नेते रामभाऊ तडवळकर, भाजपाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण, दैनिक तरुण भारतचे नितीन कवठेकर, श्रीमंत चव्हाण राष्ट्र बंजारा परिषद, दादाराव गायकवाड वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजापूर नाका पोलीस स्टेशन, यांच्या सह उत्कृष्ट कामगिरी केलेले विद्यार्थ्यांचे पालक आणि परिसरातील नागरिकांनी देखील मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. व तसेच सेवा फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष प्रकाश राठोड यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की तुम्ही जिद्द चिकाटीने अभ्यास केल्यास डॉक्टर, आय.ए.एस. आय.पी.एस. अशा अनेक शासकीय नोकऱ्या उपलब्ध होतील असे महत्त्वाचे मार्गदर्शन केले व त्यांनी समाजामध्ये एक प्रकारची चांगली जनजागृती केली त्यामुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

# सहकार महर्षि कारखान्यामध्ये जागतिक योग दिन साजरा

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामध्ये 11 वा. जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. यावर्षीचे 11 व्या जागतिक योग दिनाची थीम " एक पृथ्वी एक आरोग्यासाठी योग " अशी असून योगाभ्यास आणि त्याचे फायदे याबाबत जनजागृती करण्यासाठी संपूर्ण जगभरात दरवर्षी 21 जून जागतिक योग दिन साजरा केला जातो. मानवी जीवनात योगाचे महत्व अनन्यसाधारण असून, दररोज योगाभ्यास केल्यामुळे मानवी जीवनात शारीरीक, माणसिक आणि आध्यात्मिक पातळीवर सकारात्मक बदल घडून येतो अशी माहिती योगाभ्यास घेताना कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र केरबा चौगुले यांनी दिली.





सहकार महर्षि कारखान्याचे मार्गदर्शक संचालक विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखाना कर्मचारी यांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविले जातात.

सदर जागतिक योगदिन कार्यक्रमाकरीता कारखान्याचे चिफ इंजिनिअर-एस.के. गोडसे, चिफ केमिस्ट-एस. एन. जाधव, को-जन मॅनेजर- वाय. के. निंबाळकर, लेबर ऑफिसर-एस. एम. साळुंखे, परचेस ऑफिसर- आर. एस. गायकवाड, स्टोअर किपर- बी. व्ही. सावंत, हेड टाईम किपर- व्ही. आर. वाघ, सुरक्षा अधिकारी- एन. सी. निंबाळकर कार्यलक्षी संचालक- आर. डी. रणनवरे, कामगार व युनियन प्रतिनिधी तसेच कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जगदाळे मामा कृषी महाविद्यालयाने दिला वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित व महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित कर्मवीर डॉक्टर मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालय बार्शी येथे राष्ट्रीय सेवा योजना च्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षण करण्यासाठी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये मोठ्या उत्साहात वृक्षारोपण करण्यात आले. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या आवारात विविध प्रकारची फुलझाडे जसे की गुलाबपुष्प, मोगरा, जास्वंद तसेच शोभेची विविध झाडे लावून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.



कृषी शिक्षण घेत असताना पर्यावरणाचे महत्त्व समजून घेणे आवश्यक असून, या उद्देशाने वृक्षारोपण करून विद्यार्थ्यांनी एक सामाजिक भान दाखवले. त्यांनी झाडांच्या माध्यमातून हरित परिसर निर्माण करत एक सकारात्मक पाऊल उचलले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे खजिनदार जयकुमार शितोळे बापू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी. बी. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष शेंडे, कार्यालयीन अधीक्षक मोरे प्रा. बोनगे व्हि.इ, डॉ प्रा. रणवरे ए. वाय. प्रा. जाधव जी. व्हि. प्रा.जायभाय एम. बी. व विद्यार्थी याप्रसंगी उपस्थित होते. शितोळे बापूंनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, कृषी शिक्षण हे केवळ उत्पादनापुरते व शेतीपुरते मर्यादित नसून, निसगार्शी सुसंवाद साधणारे शिक्षण असावे. पर्यावरण जपणे हीही एक कृषी विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण प्रेम व सामाजिक भान निर्माण झाले असून, परिसरही अधिक हरित व आकर्षक बनला आहे. वृक्ष लागवडीमुळे फक्त परिसर सुशोभित झाला नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाप्रती जबाबदारीची जाणीव निर्माण झाली.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासाच्या जोरावर यशोशिखर गाठावे - जन्मेजयराजे भोसले

## पत्रकारांच्या पाल्यांना शालेय साहित्याचे वाटप

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी अभ्यास, जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर यशाचे शिखर गाठावे. उच्चपद भूषवून सेवा बजावावी. आपल्या कामाच्या माध्यमातून देशाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी केले.



रविवारी, डफरीन चौकातील आयएमए हॉल येथे सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ अक्कलकोट यांच्यावतीने पत्रकारांच्या पाल्यांना शालेय साहित्याचे वाटप श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. विचार मंचावर अन्नछत्र मंडळाचे सचिव श्यामराव मोरे, खजिनदार संजय राठोड, विश्वस्त संतोष भोसले, सौरभ मोरे, रोहित खोबरे, ॲड. नितीन हबीब, ॲड. पी. बी. लोंढे - पाटील, सकाळचे सहयोगी संपादक सिद्धाराम पाटील, तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, तरुण भारत संवादचे संपादक विजयकुमार देशपांडे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत, एकमतचे आवृत्ती प्रमुख संजय येऊलकर, द न्यूज प्लस चॅनलचे प्रमुख तात्यासाहेब पवार, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे आदी उपस्थित होते.

यावेळी दैनिक सकाळच्या सहयोगी संपादकपदी नियुक्ती झाल्याबद्दल सिद्धाराम पाटील, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल मनीष केत आणि बी. आर. न्यूज चॅनलच्या कार्यकारी संपादकपदी नियुक्ती झाल्याबद्दल अश्विनी तडवळकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी मनीष केत यांनी आपल्या भाषणात अन्नछत्र मंडळाच्या कायार्चा गौरव केला. श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी तर आभार प्रदर्शन खजिनदार किरण बनसोडे यांनी केले.

### विद्यार्थ्यांनी एकाग्रता ठेवावी : पाटील

विद्यार्थ्यांनी एकाग्रता ठेवली पाहिजे. त्या माध्यमातूनच अभ्यासाच्या जोरावर यश मिळते. निश्चित ध्येय ठरवून नियोजनात्मक वाटचाल केली पाहिजे. शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी विद्यार्थ्यांनी योगा व सूर्यनमस्कार केले पाहिजे, असे मार्गदर्शन सहयोगी संपादक सिद्धाराम पाटील यांनी केले.

# श्रीमंतयोगीच्या विद्यार्थी दत्तक योजनेतून उच्च पदस्थ अधिकारी घडावेत- शरद डोके

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरातील श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या माध्यमातून दरवर्षी गरीब होतकरू विद्यार्थी दत्तक घेतले जातात. हा स्तुत्य उपक्रम आहे. या उपक्रमातूनच उच्चपदस्थ अधिकारी घडतील. विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून जिद्द, चिकाटी आणि अभ्यासाच्या बळावर यश संपादन करावे, असे आवाहन छत्रपती शिवाजी नाईट ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य शरद डोके यांनी केले.



श्रीमंतयोगी प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी सोलापुरातील शिवस्मारक सभागृहात यंदाच्या वर्षीचा इयत्ता नववी आणि दहावीच्या गरीब होतकरू विद्यार्थी दत्तक योजनेचा शुभारंभ कार्यक्रम पार पडला. त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर प्रमुख पाहुणे म्हणून यश डेव्हलपर्सच्या संचालिका सोनीली खानापुरे, उद्योजक राहुल चंडक, धनश्री क्लिनिकचे डॉ. अजित दुलंगे, उद्योजक गोविंद मंत्री, विमा सेवा केंद्राचे सोमशंकर कंठीमठ, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवर उपस्थित होते.

सुत्रसंचालन नर्मदा कनकी यांनी केले तर आभार गणेश येळमेली यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केशव भैय्या, नागेश गडगे, संतोष अलंकुटे, अभिजीत व्हानकळस, श्रीपाद सुत्रावे, दिपक करकी, आकाश लखोटिया, दिनेश मंत्री, श्रीरंग रेगोटी, सुरेश लकडे, महेश ढेंगळे, रुपा कुत्ताते, शुभांगी लचके, अक्षता कासट, ज्योती कासट, तृप्ती पुजारी, उमा मुंगुंड, मनुश्री कासट आदींसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

गरिबी आर्थिक अडचणीमुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये या उद्देशातून श्रीमंतयोगी प्रतिष्ठान हा उपक्रम नियमितपणे राबवत आहे. अशा उपक्रमांची आज नितांत गरज आहे. या उपक्रमासाठी दानशूर व्यक्ती आणि संस्था सहकार्य करतात. या योजनेच्या नियमित यशस्वीतेसाठी सर्वांनी पाठबळ द्यावे, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.

### आठ वर्षात 371 विद्यार्थ्यांना घेतले दत्तक

श्रीमंतयोग युवक प्रतिष्ठानच्या वतीने गेल्या आठ वर्षात सर्व समाजातील 371 विद्यार्थ्यांना दत्तक घेण्यात आले आहे यंदाच्या वर्षी 61 विद्यार्थ्यांना याचा लाभ दिला आहे. या अंतर्गत विद्यार्थ्यांना गणवेश, वह्या, पुस्तके, बॅग, परीक्षा फी आणि कम्पास पेटी आदी साहित्य देण्यात आले. दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातूनच हा उपक्रम राबविण्यात येतो, असे प्रतिष्ठानचे संस्थापक महेश कासट यांनी सांगितले.

# आषाढी वारी निमित्त पंढरपूर शहर व विविध ठिकाणी दारू बंदीचे आदेश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी एकादशी पंढरपूर यात्रा 2025 निमित्त पंढरपुर शहर व परिसरात सार्वजनिक शांतता राखणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमातील कलम 142 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी खालील प्रमाणे मद्य विक्री व ताडी दुकाने बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

दिनांक 04 जुलै 2025 ते दिनांक 07 जुलै 2025 रोजी पंढरपूर शहरातील व पंढरपूर शहरापासून 5 कि.मी. त्रिज्या परिसरातील सर्व देशी विदेशी मद्य विक्री व ताडी दुकाने पूर्ण दिवस बंद राहतील.

दिनांक 09 जुलै 2025 व दिनांक 10 जुलै 2025 रोजी पंढरपूर शहरातील व पंढरपूर शहरापासून 5 कि.मी. त्रिज्या परिसरातील सर्व देशी व विदेशी मद्य विक्री व ताडी दुकाने सायंकाळी 05.00 वाजेपासून बंद.

तसेच आषाढी एकादशी पंढरपूर यात्रा 2025 निमित्त संत श्री तुकाराम महाराज व संत श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी मुक्कामाच्या ठिकाणी (गावात/शहरात) सार्वजनिक शांतता राखणेसाठी, खालील प्रमाणे मद्य विक्री व ताडी दुकाने बंद ठेवण्याचे आदेश देत आहे

सोमवार दि. 30 जुन 2025 - नातेपुते पूर्ण दिवस बंद राहिल, मंगळवार दि.1 जुलै 2025 माळशिरस, अकलुज पूर्ण दिवस बंद राहिल , बुधवार दि. 2 जुलै 2025 रोजी वेळापूर, बोरगांव, श्रीपूर, माळीनगर पूर्ण दिवस बंद राहिल. गुरुवार दि.3 जुलै 2025 रोजी भंडीशेगाव, पिराची कुरोली पूर्ण दिवस बंद राहिल. शुक्रवार दि.4 जुलै 2025 रोजी वाखरी पूर्ण दिवस बंद राहिल.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्रि.कि.अर्ज क्र: ४०३/२०२५ नि.०६

**सोलापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो,यांचे न्यायालयात**

१) चाँद निजाम शेख
वय - ५४ वर्षे, धंदा- मजुरी,
रा. १९१, जुना कारबा नाका,
बुधवार पेठ, सोलापूर.
२) जैनोद्दीन निजाम शेख
वय- ५१ वर्षे, धंदा- मजुरी,
रा. ५८, विजय नगर, अल मोमीन मस्जिद
समोर, मजरेवाडी सोलापूर
३) रमजान निजाम आमले
वय : ३८ वर्षे, धंदा मजुरी,
रा. १२१/२८, प्रभाकर महाराज मंदिर
रोड, जवळकर वस्ती, सोलापूर
} **अर्जदार**

**विरुध्द**

कोणीही नाही. } **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणेसंबंधीया अर्ज दाखल केला आहे. अर्जदार नं.१ ते ३ यांचे वडिल निजाम इस्माईल शेख ऊर्फ आमले है दि.१५/१०/२०१५ रोजी व आई जुबेदा निजाम आमले यांचे दि.०८/११/२०१६ रोजी मृत्यु झालेला आहे. त्यामुळे सदर अर्जदार नं.१ ते ३ यांनी डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ मधील मजरेवाडी येथील सर्व्हे नं. २२४ पैकी विजय नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील प्लॉट नं.५८ यांसी क्षेत्र १००० चौ. फुट अथवा ९२.९३ चौ.मी. इतके असून, यांसी मालमत्ता क्र. ६४२३७२ असा असून यासी चतु:सिमा:- पुर्वेस :- प्लॉट नं.५७, पश्चिमेस प्लॉट नं.५९, दक्षिणेस:- प्लॉट नं. ६६, उत्तरेस रस्ता सदर मिळकतीबाबत त्यांचे नावे वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या मे. कोर्टात हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद अर्जदार यांना वारसा दाखला (हेअर सर्टिफिकेट) देण्याबाबत कोणाची कसलीही हरकत असल्यास त्यानी है जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाचे आत अगर नेमलेली तारीख २५/०७/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपले म्हणणे सादर करावे, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय योग्य तो हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आज दि.२०/६/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**हुकूमावरुन**
**सहा.अधिक्षक**
**सि.ज.सि.डी.**

कनिष्ठ लिपीक (शिक्का)

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र: ३५९/२०२५ नि.०६

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

१) सविता भगत फत्तेवाले, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम रा. ८९५, बेडर पूल, उत्तर सदर बझार, सोलापूर.
२) गीताबाई बन्सी बाडीवाले,वय ४२ वर्ष,धंदा: बिडीकाम रा.१७१,हुच्चेश्वर नगर भाग-३,लोधी गल्ली, सोलापूर
३) छोटी दिपक चौधरी, वय ३९ वर्षे, धंदा : बिडीकाम, रा. ५८०, उत्तर सदर बझार, लोधी गली, सोलापूर.
} **अर्जदार**

**विरुध्द**

कोणीही नाही. } **सामनेवाला**

सोलापूर शहर व जिल्ह्यातील तमाम जनतेस या जाहिर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविणेत येते की, ज्यार्थी यातील अर्जदार नं. १ ते ३ यांची जनक माता सोनाबाई पांडूसिंग कजाकवाले ही बॉम्बे होते. अर्जदार नं. १ ते ३ यांची आई सोनाबाई पांडूसिंग कजाकवाले हे दि.०३/०१/२०१२ रोजी मयत विष्णू बिडी वर्क्स, शाखा गणेश पेठ, सोलापूर येथे घरखेप विडी कामगार म्हणून हयातीत काम करीत झाले. तसेच अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडील पांडूसिंग सिताराम कजाकवाले हे यापूर्वीच दि.०९/०२/२०१२ रोजी राहत्या घरी मयत झाले आहेत. अर्जदार नं. १ ते ३ यांची आई ही त्यांचे हयातीत यातील अर्जदारांसमवेत त्यांचे मृत्युपावेतो राहात होते. मयताचे हयातीत व आजारपणाचे काळात यातील अर्जदारांनीच त्याची सेवा सुश्रुषा केली आहे व मृत्युनंतर अंत्यसंस्काराचे वेळी व तद्नंतरचे सर्व धार्मिक विधी वगैरे अर्जदार यांनीच मयताचे वारस यानात्याने पार पाडले आहेत.

यातील मयत सोनाबाई पांडूसिंग कजाकवाले यांचे नांवे त्याचे मृत्युपश्चात भविष्य निर्वाह निधी कार्यालय, सोलापूर येथे मयताचा पी.एफ. खाते क्र.PUSLP00172500000002489 व त्याचा यु.ए.एन.नं.100359872483 असा असून फंडाची अंदाजे रक्कम रू.१०,०००/- तसेच पेन्शन, विमा, बोनस, मजूरी, ग्रॅच्युटी व इतर देय रकमा जमा आहेत. तसेच बँक ऑफ महाराष्ट्र शाखा सिव्हील हॉस्पीटल, सोलापूर येथे बचत खाते क्र. २५०१६०१७०६९ वर रक्कम रू. ४९६४/- इतकी रक्कम जमा आहे.

यातील मयत सोनाबाई पांडूसिंग कजाकवाले यांचे मृत्युपश्चात भविष्य निर्वाह निधी कार्यालय, सोलापूर व बँक ऑफ महाराष्ट्र शाखा सिव्हील हॉस्पीटल, सोलापूर येथे वर नमुद जमा रक्कमा अर्जदार यांना वारसदार या नात्याने मिळणे गरजेचे व न्यायाचे आहे, त्याकरीता अर्जदार यांनी मे. कोर्टात सक्सेशन सटीफिकेट मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याआर्थी यातील अर्जदार नं. १ ते ३ हे मयताचे जवळचे वारस नाहीत अथवा अन्य कोणी आहेत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमलेली तारीख दि.२९/०८/२०२५ रोजी मे.कोर्टात हजर राहून आपल्या हरकती नोंदवून वर नमुद वेळेत कोणाची हरकत आली नाही तर सदरचे मे.कोर्ट अर्जदार नं.१ ते ३ यांचे नावे सक्सेशन सट्रीफीकेट देण्याचा हुकूम करेल. त्यानंतर कोणाची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण दिलें ता.२०/०६/२०२५

**हुकूमावरुन**
**सहा.अधिक्षक**
**सिव्हील जज्ज, सिनिअर डिव्हीजन सोलापूर**

कनिष्ठ लिपीक (शिक्का)